नि.फौ.ख.क्र.४७/२०१३
सरकार वि. प्रभाकर
**नि.क्र.४५**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : शशिकांत अन्नाजी सुके

वय : ६२ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

राहणार : बजाजनगर, नागपूर, ता.व जि. नागपूर.

**सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.ए.फुले यांच्या मार्फत सुरुः–**

कथीत घटना ही सन २०११ ते २०१२ च्या दरम्यान घडली होती. त्यावेळी मी उपविभागीय अभियंता म्हणुन उपविभाग, मौदा येथे कार्यरत होतो. त्यावेळी माझ्या कडे मौदा व कुही या तालुक्यांचा पदभार होता. त्यावेळी मौजे चाडा, ता.कुही येथे ग्राम पाणीपुरवठा व स्वच्छता समीतीच्या अध्यक्षा इंदुबाई नरुले या होत्या व प्रभाकर नरुले हे सचिव होते. सदर समीतीने पाणी पुरवठा विहीर, उर्ध्व नलिका, पाण्याची टाकी व गावात पाण्याच्या वितरणासाठी लोक वर्गणी केली होती. त्याबाबत जिल्हा परिषद, नागपूर यांनी त्यांना त्यासाठी प्रथम हप्ता वितरीत केला होता. जिल्हा परिषद नागपूर यांनी सदर हप्त्याची रक्कम रुपये ५,९५,०००/– वितरीत केली होती. सदर रकमेतून पाणी पुरवठा व स्वक्च्छता समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी सदरचे काम सुरु करावयाचे होते. त्यामध्ये विहीरीचे १५ मिटर खोल काम करावयाचे होते परंतु त्यांनी ९.५ मिटर काम केले होते. पाण्याच्या टाकीसाठी फक्त खड्डा खोदला होता. विहीरीपासुन पाण्याच्या टाकीपर्यंत उर्ध्व वाहिणी टाकली होती. आमच्या विभागाने त्यांना काम पूर्ण करण्याबाबत वेळोवेळी पत्र दिले. त्यानुसार त्यांनी फक्त थोडेफार काम केले होते व त्यानंतर कोणतेही काम केले नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी हे झालेल्या कामाबाबत बैठक घेऊन आढावा घेत होते. त्यामध्ये आम्ही त्यांना असे सांगितले की, आरोपींना वेळोवेळी पत्र देऊन सुध्दा त्यांनी काम पूर्ण केले नाही. त्यामुळे त्यांनी त्याबाबत समीती स्थापन केली. त्यामध्ये लेखा अधिकारी, उप अभियंता, भिवापूर व सहायक लेखा अधिकारी असे सदस्य होते. सदर समीतीने मौजे चाडा येथे येऊन चौकशी केली व त्याचा

अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे सादर केला. सदर अहवालामध्ये असे नमुद होते की आरोपींना वितरीत केलेल्या पैशापेक्षा कमी काम केले होते व त्यांनी रुपये १,२७,१५०/– इतके जास्त पैसे काढले होते. त्यामुळे कार्यकारी अधिकारी यांनी आरोपींना जास्त काढलेल्या पैशाचे काम करण्याबाबत सांगितले होते. परंतु त्यानुसार आरोपींनी काम केले नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या वतीने कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा, नागपूर यांनी मला आरोपींविरुध्द तक्रार देण्यासाठी सांगितले. त्यानुसार मी पोलीस ठाणे, कुही येथे लेखी तक्रार दाखल केली होती. आता मला तक्रार दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४६** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४७** देण्यात येते. त्यानंतर पोलीसांनी माझ्या समक्ष दिनांक ०३.०८.२०१२ रोजी घटनास्थळ पंचनामा केला होता. त्यावेळी पंच हेवेंद्र डोंगरे व श्रावण राउत हे हजर होते. घटनास्थळ मी दाखविले होते. त्यानंतर दिनांक २२.०१.२०१३ रोजी पोलीसांनी कार्यकारी अभियंत कार्यालयातून गुन्ह्याबाबत कागदपत्र हस्तगत केले होते. त्यावेळी पंच रहिमान पठान व राजेश गोडे हे हजर होते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.४८** देण्यात येते. माझ्या समक्ष जप्त केलेला अभिलेख पाहील्यास मी ओळखु शकतो. आता मला अभिलेखावरील मौजे चाडा ता.कुही येथील नळ योजनेच्या बांधकामात मुल्यांकनापेक्षा जास्त खर्च केल्याबाबत अभिलेख दाखविण्यात आला. तो तोच आहे. आरोपीच्या वतीने असा आक्षेप घेण्यात आला की, सदर अभिलेख हा लाख मोहोर सिलबंद केलेला नाही. त्यामुळे त्यास निशाणी क्रमांक देता येणार नाही. सदर आक्षेपास आदीन राहुन त्यास एकत्रीतपणे **नि.क्र.४९** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकतो. आरोपी प्रभाकर हा आज रोजी न्यायालयात हजर आहे. आरोपी इंदुबाई यांना पाहिल्यास मी ओळखु शकतो.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपी क्र.१ तर्फे नि.क्र.४४ नुसार सादर करण्यात आला की, त्यांच्याकडे खटल्यासंदर्भात काही कागदपत्र उपलब्ध नसल्यामुळे त्यांना आरोपी क्र.२ यांच्या मार्फत उलटतपास**

झाल्यानंतर उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात यावी. सदर अर्ज मंजुर करण्यात आला. करीता उलटतपास आरोपी क्र.२ चे विधिज्ञ श्री. डी.ए.गोल्हर यांच्या मार्फत सुरुः–

२. हे म्हणणे खरे आहे की, मी यापूर्वी चार ते पाच वेळेस न्यायालयात आलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणाबाबत माझे व आरोपी प्रभाकर यांचे बोलणे झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझा व अरोपीचा नमस्कार होत होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी त्याला, तुमच्यावर विनाकारण केस लागली आहे असे म्हणालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यांना असेही म्हणालो की वरीष्ठांचा आदेश असल्यामुळे मला तक्रार द्यावी लागली. आता मला माझ्या तक्रारीतील अधोरेखांकीत भाग–अ मधिल मजकुर वाचुन दाखविण्यात आला. सदर मजकुर बरोबर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर मजकुर हा चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, शासनाने वितरीत केलेल्या रकमेचे काम आरोपींनी केलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी दिनांक १३.०४.२०१० पर्यंत कोणतेही काम केले नाही हे खोटे आहे. अपहार झाल्याचे सन २०११–२०१२ च्या दरम्यान लक्षात आले होते. मी निश्चित तारीख सांगु शकत नही. आता मला माझ्या तक्रारीतील अधोरेखांकीत भाग–ब मधिल मजकुर वाचुन दाखविण्यात आला. सदर मजकुर बरोबर आहे. सदर नमुद नियुक्तीबाबत मी पोलीसांना कागदपत्र दिले नव्हते. दिनांक १३.०४.२०१० नंतर आरोपींनी निश्चित कोणत्या तारखेला काम बंद केले याची तारीख मी निश्चित सांगु शकत नाही. तसेच ती तारीख तक्रार नि.क्र.४६ मध्ये नमुद नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी दिड वर्ष उशिरा तक्रार दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, तक्रार देण्यास झालेल्या विलंबाचा कोणताही खुलासा तक्रारीमध्ये केलेला नाही. पोलीसांनी माझे पोलीस ठाण्यात बयान घेतले होते. सदर बयान मी वाचुन पाहिले होते किंवा कसे हे मला आठवत नाही. पोलीसांनी माझे बयान माझ्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. त्यावेळी मी पोलीसांना लोकवर्गणी रुपये ६,०००/– केल्याचे सांगितले नव्हते. लोकवर्गणी रुपये ६,०००/– बाबतचा मजकुर चुक आहे. रुपये ५,९५,०००/– वितरीत केले होते विहीरीचे १५ मिटर खोल काम करावयाचे होते, ही बाब माझे तक्रार अथवा बयानामध्ये नमुद नाही. विहीरीपासून टाकीपर्यंत उर्ध्व नलीका टाकली होती ही बाब मी पोलीसांना सांगितली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी न्यायालयासमोर प्रथम सांगितली आहे. आमच्या विभागाने त्यांना काम पूर्ण करण्याबाबत

वेळोवेळी पत्र दिले, त्यानुसार त्यांनी फक्त थोडेफार काम केले होते व त्यानंतर कोणतेही काम केले नाही, मुख्य कार्यकारी अधिकारी हे झालेल्या कामाबाबत बैठक घेऊन आढावा घेत होते, त्यामध्ये आम्ही त्यांना असे सांगितले की, आरोपींना वेळोवेळी पत्र देऊन सुध्दा त्यांनी काम पूर्ण केले नाही. सदर बाबी मी पोलीसांना सांगितल्या होत्या सदर बाबी माझ्या बयानात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

३. हे म्हणणे खरे नाही की, शासनाने वितरीत केलेल्या पैशांचे आरोपींनी काम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी १,२७,१५०/– रुपयांचा अपहार करुन शासनाचा विश्वासघात केला हे मी खोटे सांगत आहे. आरोपींनी रक्कम रुपये ६,४८,२९५/– चा उचल केल्याबाबत मी पोलीसांना बँक खात्याचा उतारा दिला होता. सदर उतारा अभिलेखावर का दाखल नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष घटनास्थळ पंचनामा केलेला नाही तसेच माझे समक्ष कोणताही अभिलेख जप्त केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, नमुद काम हे शासकीय काम होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व कार्यकारी अभियंता हे आरोपींना कमीशन मागत होतो व त्यांनी ते दिले नाही म्हणुन त्यांचे विरुध्द खोटी तक्रार दिली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही कामाचे मुल्यांकन हे अधिकृतपणे केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरीष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी तक्रार दिली आहे व आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

<u>**आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. आर.जे गायकवाड यांचे मार्फत सुरु–**</u>

४. हे मला आठवत नाही की, मला आरोपींविरुध्द तक्रार देण्यासाठी माझ्या वरीष्ठांनी दिलेले पत्र अथवा आदेश मी पोलीसांना दिले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, मला आरोपींविरुध्द तक्रार देण्याबाबत कोणताही आदेश नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपींविरुध्द खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, रहिमान पठान व राजेश गोडे हे आमच्या विभागातील कंत्राटदार व कर्मचारी आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यांनी माझ्या सांगण्यावरुन पंचनामावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे. (आरोपी क्र.२ तर्फे घेण्यात आलेला उलटतपास

आरोपी क्र.१ चा उलटतपास समजण्यात यावा असे आरोपी क्र.१ ने नमुद केले).

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक १३.०८.२०२५

(पी.के.मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
कुही.

नि.फौ.ख.क्र.४७/२०१३

सरकार वि. प्रभाकर

**नि.क्र.५०**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.२</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : हेमेंद्र रामजी डोंगरे

वय : ६३ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

राहणार : वैशालीनगर, नागपूर, ता.व जि. नागपूर.

**<u>सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.ए.फुले यांच्या मार्फत सुरुः–</u>**

दिनांक ०३.०८.२०१२ रोजी दुपारी ०४.३० वजता पोलीसांनी मला मौजे चाडा येथे पंचनामा करण्यासाठी बोलावीले होते. घटनास्थळ हे उपविभागीय अभियंता सुके याने दाखविले होते. त्यावेळेस दुसरा पंच श्रावण राऊत हा हजर होता. सदर पंचनामा हा बांधकामाच्या विहीरीचा मोजमापाचा होता. पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा तयार केला होता. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.५१** देण्यात येते.

सरतपास संपला.

**<u>उलटतपास आरोपी क्र.२ चे विधिज्ञ श्री. डी.ए.गोल्हर यांच्या मार्फत सुरुः–</u>**

२. घटनास्थळ पंचनामा करण्यासाठी उपस्थित राहण्याबाबत पोलसांनी माला नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पंचनामातील मजकुर वाचुन पाहिला नसल्यामुळे मला आज रोजी आठवत नाही. पंचनामाच्या वेळी आम्ही हजर असल्याबाबत पोलीसांनी आमच्या कडुन काहीही घेतलेले नाही अथवा आमचे जबाब घेतले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी मी शाखा अभियंता म्हणुन नेमणुकीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी फिर्यादी हे उपविभागीय अभियंता म्हणुन कार्यतर होते. हे म्हणणे खरे आहे की, ते व मी एकाच कार्यालयात नेमणुकीस होतो. हे म्हणणे खरे आहे की, श्री. सुके हे माझे वरिष्ठ होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यांचे सांगण्यावरुन मी घटनास्थळ पंचनामावर सही केली आहे.

हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामावर सही मी पोलीसांच्या सांगण्यावरुन पोलीस ठाण्यात केली होती.

**उलटतपास संपला.**

**<u>आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. आर.जे गायकवाड यांचे मार्फत सुरु–</u>**

३. पंचनामा किती वाजता सुरु झाला व किती वाजता संपला हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा न वाचता त्यावर सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

दिनांक १३.०८.२०२५

(पी.के.मुटकुळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कुही,जि.नागपूर

नि.फौ.ख.क्र.४७/२०१३

सरकार वि. प्रभाकर

**नि.क्र.५५**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३</u>**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव : बाळासाहेब रंगरावजी काळमेघ

वय : ६६ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,

राहणार : गुरुदेव नगर, नंदनवन, नागपूर, ता.व जि. नागपूर.

**<u>सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.ए.फुले यांच्या मार्फत सुरुः–</u>**

दिनांक १८.११.२००८ रोजी मी शाखा अभियंता म्हणुन मौदा उपविभाग येथे कार्यरत होतो. त्यावेळी माझ्याकडे कुही येथील पाणी पुरवठ्याचा पदभार होता. पदभार घेतल्यानंतर मी व उपअभियंता शशिकांत सुके यांनी मौजे चाडा येथे मोक्यावर पाहणी केली असता काही प्रमाणात विहिरीचे काम झाले होते. विहीरीचे साडे नऊ मिटर खोदकाम झाले होते. त्यावेळी समितीच्या अध्यक्ष नरुळे नावाच्या महिला व सचिव प्रभाकर नरुळे हे होते. त्यानंतर त्यांनी विहीरीचे खोदकाम व बांधकाम केल्यानंतर आम्ही त्याचे मुल्यांकन केले. आता मला मुल्यांकनाची छायांकीत प्रत दाखवली. ती तीच आहे. त्यास **आर्टीकल–ए** देण्यात येते. सदर कामासाठी समितीला शासनाकडुन रुपये ५,९७,२१७/– मिळाले होते व लोक वर्गनितुन रुपये ६०,०००/– जमा झाले होते. विहीरीच्या कामाचे मुल्यांकन हे रुपये ५,०७,८८०/– झाले होते. शासनाकडुन मिळालेली रक्कम ही जास्त होती. सदरची जास्तीची रक्कम त्यांच्या खात्यामध्ये आढळुन आली नाही. त्यामुळे आम्ही समितीला पत्र व्यवहार करुन जास्तीची रक्कम खात्यामध्ये जमा करण्यास कळवीले. तसेच त्याबाबत वरिष्ठांनासुध्दा कळवीले. परंतु समितीने नमुद रक्कम खात्यात जमा केली नाही. त्यामुळे वरिष्ठांनी आम्हाला तक्रार देण्याबाबत कळवीले. त्यानंतर उप अभियंता सुके यांनी त्याबाबत तक्रार नोंदवीली. आर्थिक अपहारासाठी समितीचे अध्यक्ष व सचिव जबाबदार होते कारण त्यांना समितीच्या खात्यातुन पैसे काढण्याचा व जमा करण्याचा अधिकार होता. आज रोजी समितीचे अध्यक्ष व सचिव हजर आहेत.

सरतपास संपला.

**<u>आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. आर.जे गायकवाड यांचे मार्फत सुरु–</u>**

०२. आरोपी क्र.०१ तर्फे असे नमुद करण्यात आले की, आरोपी क्र.०२ कडुन घेण्यात आलेला उलटतपास त्यांना मान्य असेल.

**<u>आरोपी क्र.२ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. डी. ए. गोल्हर यांचे मार्फत सुरु–</u>**

०३. विहीरीचे बांधकाम सन २००६ मध्ये सुरु झाले होते. मी निश्चित कोणत्या तारखेला विहीरीचे काम पाहण्यासाठी गेलो होतो हे सांगु शकत नाही. साक्षीदार सांगतो की मी नोव्हेंबर २००८ मध्ये गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, सन २००८ नंतर मी पोलीसांना २०12 साली पहिल्यांदा पोलीस ठाण्यात बयान दिले. पोलीसांनी माझे बयान मौजे चाडा येथे घेतले नव्हते. पोलीसांनी पोलीस ठाणे ऐवजी मौजे चाडा येथे बयान घेतल्याचे का नमुद केले हे मी सांगु शकत नाही. माझ्या बयानातील लोक वर्गणीची रक्कम रुपये ६,०००/– ही चुकीची आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी बँकेकडुन चौकशी करुन व अहवाल घेऊन पोलीसांना कागदपत्र दिले नव्हते. मी वरिष्ठांना केलेल्या पत्र व्यवहाराच्या प्रती पोलीसांना दिल्या नव्हत्या. तसेच समितीला दिलेल्या नोटीसची प्रत मी पोलीसांना दिलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे कोणताही अपहार झाला नाही. त्यामुळे मी पोलीसांना कागदपत्र दिले नव्हते. मी पोलीसांना बयान देतांना "आम्ही समितीला पत्र व्यवहार करुन जास्तीची रक्कम खात्यामध्ये जमा करण्यास कळवीले. तसेच त्याबाबत वरिष्ठांनासुध्दा कळवीले. परंतु समितीने नमुद रक्कम खात्यात जमा केली नाही. त्यामुळे वरिष्ठांनी आम्हाला तक्रार देण्याबाबत कळवीले" असे सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, सदर बाब मी आज प्रथम सांगत आहे. मी पोलीसांना लोकवर्गणीतुन रुपये ६०,०००/– जमा झाले होते असे सांगितले होते. सदर बाब माझ्या जबाबात का नमुद नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या संबधाने मी आज रोजी पाहिल्यांदा बयान देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी विहिरीच्या खोदकामाचे व बांधकामाचे योग्य मुल्यांकन केले नसल्यामुळे संबंधीत दस्त दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन मी कार्यालयात बसुन सर्व अभिलेख तयार केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, अपहाराबाबत मी काल्पनीक कथन केले

आहे. खोदकामाचा पंचनामा केला त्यावेळी कोण पंच होते हे मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, संबंधीत प्रकरणात कोणतीही आर्थिक अनियमीतता अथवा अपहार झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याबाबत कोणतीही चौकशी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नमुद केल्याप्रमाणे कोणताही आर्थिक अपहार झाला नाही. हे म्हणणे खरे आहे की, समीतीने लोक वर्गणीतुन जमा झालेली रक्कम वापरुन विहीरीचे काम केले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी समितीकडे चौकशी करुन अभिलेख सन २००८ मध्ये मागितला होता. हे म्हणणे खरे आहे की, समितीने आम्हाला अभिलेख दाखवला नसल्यामुळे आम्ही लगेच फौजदारी कारवाई केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी यांनी आमच्या मर्जीनुसार काम केले नसल्यामुळे आम्ही संगनमताने त्यांचे विरुध्द खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना आम्ही खोट्या गुन्ह्यात गोवले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/–

दिनांक ०१.०४.२०२६

(पी.के.मुटकुळे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कुही,जि.नागपूर

नि.फौ.ख.क्र.४७/२०१३
सरकार वि. प्रभाकर
**नि.क्र.५६**

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.०४**

मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,
माझे नाव : अश्वीन वामनराव कुरळकर,
वय : ६१ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त,
राहणार : ईश्वर नगर, नागपूर, ता.व जि. नागपूर.

**सरतपास सरकारी अभियोक्ता श्रीमती व्ही.ए.फुले यांच्या मार्फत सुरुः–**

दिनांक १०.०३.२००६ रोजी मी जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मौदा येथे शाखा अभियंता म्हणुन कार्यरत होतो. सदर कार्यालया अंतर्गत कुही शाखा कार्यालय होते. माझ्या कार्यकाळात मौजे चाडा येथे भारत निर्माण योजनेअंतर्गत पाणी पुरवठा योजना मंजुर झाली होती. सदर योजनेचे काम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती मौजे चाडा यांनी करावयाचे असल्यामुळे त्यांनी त्याबाबत कंत्राटदार दुधनकर ॲन्ड सन्स यांची नेमणुक केली होती. सदर समितीचे अध्यक्ष प्रभाकर नरुले व सचिव इंदुबाई नरुले हे होते. त्यानंतर सदर समितीने पाणी पुरवठा विहीरीचे काम सुरु केले. माझ्या कार्यकाळात विहिरीचे १० मिटर खोल काम झाले होते. त्यामध्ये तीन रिंग व एक बिम विहीरीचे बांधकाम झाले होते. सदर कामाबाबत आम्ही त्यांना वेळोवेळी तांत्रीक सुचना देत होतो. त्याचे ते कधी पालन करत असत तर कधी करत नसत. त्यानंतर माझी बदली झाली होती.

सरतपास संपला.

**आरोपी क्र.१ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. आर.जे गायकवाड यांचे मार्फत सुरु–**

०२. आरोपी क्र.०१ तर्फे असे नमुद करण्यात आले की, आरोपी क्र.०२ कडुन घेण्यात येणारा उलटतपास त्यांना मान्य असेल.

**आरोपी क्र.२ तर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. डी. ए. गोल्हर यांचे मार्फत सुरु–**

०३. हे म्हणणे खरे आहे की, माझे व श्री काळमेघ यांचे बयान पोलीस ठाणे येथे घेतले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर पोलीसांनी माझ्याकडे कोणतीही चौकशी केली

नाही. असे घडले नव्हते की पोलीसांनी मला मौजे चाडा येथे बोलावून माझे बयान घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. मौजे चाडा येथील पाणी पुरवठा योजना सन २००७ ला सुरु झाली होती. माझी बदली सन २००८ मध्ये झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, बदली झाल्यानंतर माझा मौजे चाडा येथील पाणी पुरवठा योजनेशी कोणताही संबंध राहिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे बांधकामाचे मुल्यांकन कोणी व कसे केले हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझी बदली झाल्यानंतर श्री. एम.आर. डोंगरे यांनी कार्यभार पाहिला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदरच्या योजनेची रक्कम रुपये १३,२७,१५०/– होती. हे म्हणणे खरे आहे की, विहीरीचे बांधकाम, खोदकाम हे समितीमार्फत होत होते. हे म्हणणे खरे आहे की, त्याबाबतचे आर्थिक व्यवहार श्री. दुधनकर व समिती हे पाहत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कार्यकाळात श्री. दुधनकर यांनी काम केले होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे बयान सन २०१२ मध्ये नोंदवीले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी, शशिकांत सुके, देवेंद्र डोंगरे व बाळासाहेब काळमेघ असे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यामुळे आमचे एकमेकांशी चांगले संबंध होते. शशिकांत सुके हे माझे वरीष्ठ होते. हे म्हणणे खरे आहे की, शशिकांत सुके यांनी मला बयान देण्याचे सांगितल्यावरुन मी बयान दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही सर्वांनी पोलीस ठाणे येथे एकमेकांशी सल्ला मसलत करुन बयान दिले होते. असे घडले नव्हते की लोकवर्गणीतून रुपये ६,०००/– जमा झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, समितीचे अध्यक्ष व सचिव यांनी श्री. सुके यांच्या मर्जीप्रमाणे काम केले नाही त्यामुळे त्यांनी आम्हाला हाताशी धरुन खोटे प्रकरण तयार केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

स्वाक्षरी/–

दिनांक ०१.०४.२०२६

(पी.के.मुटकुळे)

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, कुही,